# प्रेसनोट २६/९/२०१७

## २०० घरफोडया करणारा अटटल गुन्हेगारास विमानतळ पोलीसांकडुन अटक

दिनांक २८/९/२१७ रोजी विमानतळ पोलीस स्टेशनचे गुन्हे तपास पथकाचे अधिकारी श्री. एम आर खोकले पोलीस उप निरीक्षक ए डी पिंगळे व तपास पथकाचे कर्मचारी मोहन काळे, विजय सावंत, अशोक आटोळे विश्वनाथ गोणे, पुष्पेंद्र चव्हाण, संजय आढारी, राहुल मोरे, विशाल गाडे, वशिम सैयद, हारुण पठाण, अमोल भोसले, सचिन भिंगारदिवे, प्रशांत कापुरे, विनोद महाजन, स्वप्नील जाधव, अविनाश संकपाळ असे लोहगाव परिसरात गस्त करीत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, लोहगाव भागात एक ५५ ते ६० वर्षे वयाचा इसम काळया रंगाचे होंडा ॲक्टीवा स्कुटरवरुन संशयीत रित्या फिरत आहे अशी बातमी मिळाल्याने सोबतचे स्टाफसह लोहगाव भागात संशयीत इसमाचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्याचेकडे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नावरवि गोपाळ शेटटी वय ५९ वर्षे रा. काळुंद्रेगाव तालुका पनवेल जि. रायगड असे सांगितले. त्याचेकडे लोहगाव भागात येण्याचे व फिरण्याचे कारण विचारले असता असमाधानकारक उत्तरे दिल्याने त्याचे ताब्यातील ॲक्टीवा स्कुटर नंबर एम एच १४ बी जी ९४०६ या स्कुटरचे डिगीची पाहणी केली असता त्या मध्ये घर फोडी चोरी करण्यासाठी आवश्यक असणारी साधने १.लोखंडी कटावणी, २. कूलूप तोडण्यासाठी आवश्यक असणारी लोखंडी पक्कड, ३. छन्नी हातोडी, ४. व्हेक्सा ब्लेड अशा वस्तु मिळुन आल्याने त्या बाबत विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिल्याने त्यास विमानतळ पोलीस स्टेशन येथे आणुन अधिक तपास केला असता तो पुणे शहरातील घर फोडया चो-या करणारा अटटल गुन्हेगार असल्याचे आढळुन आले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय नाईक पाटील व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री विलास सोंडे यांचे मार्गदर्शनाखाली सदर इसमाकडे सखोल तपास केला असता त्याने अनिलकुमार गौतम रा. संत नगर लोहगाव पुणे यांचे घर बंद असताना कुलूप तोडुन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यास दिनांक २४/९/२०१७ रोजी अटक करुन त्याची दिनांक २८/९/२०१७ रोजी पर्यत पोलीस कस्टडीची रिमांड घेवुन आरोपीकडे केलेल्या तपासामध्ये त्याने विमानतळ पोलीस स्टेशन, हडपसर, दिघी, खडकी, देहुरोड, भारती विदयापीठ, लोणीकंद, येरवडा, चंदननगर इत्यादी पोलीस स्टेशनचे हददीत रात्री व दिवसा एकुण २० ठिकाणी घर फोडया करुन घरातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरी केलेचे निष्पन्न झाले असुन त्याचेकडे तपास करुन ५१५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, व लगड, ८ मोबाईल हॅडसेट, ॲक्टीवा स्कुटर,घरफोडी करण्यासाठी आवश्यक असणारी साधणासह एकुण १८,००,०००/- रु किमतीचा मुदेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयाचा तपास मा. श्री. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, पुणे शहर, श्री. वसंत तांबे सहा पोलीस आयुक्त सो खडकी विभाग पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय नाईक पाटील व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री विलास सोंडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री. आनंदराव पिंगळे हे करीत आहेत.

